# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### वरोरा नगरपरिषदेस (जि.चंद्रपूर) वैशिष्टपूर्ण योजनेंतर्गत अनुदान प्राप्त करुन देण्याबाबत

**(१) ८६५७ (०६-०७-२०१५). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरोरा नगरपरिषदेस (जि.चंद्रपूर) वैशिष्टपूर्ण योजनेंतर्गत अनुदान प्राप्त करुन देण्यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १५ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्री यांना एक लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-९-२०१५) :** (१) होय.

(२) वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत सन २०१३-१४ करिता रु. ८०.०० लक्ष व सन २०१४-१५ वर्षाकरिता रु. ९०.०० लक्ष असे एकूण रु. १७०.०० लक्ष इतका निधी जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या मार्फत वरोरा नगरपरिषदेस वितरीत केलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ तालुक्यात जातीवाचक प्रतिबंधक कायद्याच्या (अॅट्रॉसिटी) एकूण ५५३ गुन्हे दाखल झाल्याबाबत.

**(२) ७३४९ (०७-०४-२०१५). श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोहोळ (जि.सोलापूर) तालुक्यात जातीवाचक प्रतिबंधक कायद्याच्या (अॅट्रॉसिटी) एकूण ५५३ गुन्हे दाखल आहेत, हे खरे आहे काय,

(२) यासंदर्भात जिल्हाधिकारी सोलापूर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात दिनांक ५ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास ॲट्रॉसिटी कमिटीची बैठक आयोजित करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ॲट्रॉसिटीचे गुन्हे कमी करण्याबाबत या बैठकीत कोणते निर्णय घेण्यात आले आहेत काय,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०९-२०१५) :** (१) नाही.

सन २००१ ते २०१४ या कालावधीत सोलापूर ग्रामीण जिल्ह्यात जातीवाचक प्रतिबंधक कायद्याअंतर्गत (ॲस्ट्रासिटी) ५५३ गुन्हे घडलेले असून, त्यापैकी मोहोळ तालुक्यात ९१ गुन्हे घडलेले आहेत.

(२) होय.

दि.५.१.२०१५ रोजी जिल्हा दक्षता व नियंत्रण समितीची बैठक आयोजित करण्यात आलेली होती.

(३) पोलीस विभागात दाखल झालेले गुन्हे शिघ्रतेने तपास पूर्ण करुन ९० दिवसात न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्याचा निर्णय घेण्यात आला.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील डॉक्टर, इंजिनिअर, सरकारी वकील आणि शिक्षकांना लाच स्वीकारताना एसीबीने पकडल्याबाबत

**(३) ८७४० (६-४-२०१५). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर), श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१४ मध्ये एसीबीने राज्यातील ३० डॉक्टर, ८७ इंजिनिअर, १२ सरकारी वकील आणि ३० शिक्षकांना लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भ्रष्टाचारात तिस-या क्रमांकावर पंचायत समित्या, चौथ्या क्रमांकावर राज्यातील पालिका आणि पाचव्यावर शिक्षण विभाग असल्याचे समोर आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) असल्यास, लाचखोरी रोखण्याबाबत शासन काही ठोस उपाययोजना करणार आहे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-८-२०१५) :** (१) होय.

(२) सन २०१२ मध्ये लाचलुचपत प्रतिबंधक विभागाद्वारे टाकण्यात आलेल्या एकूण लाचेच्या सापळा प्रकरणी प्रथम पाच क्रमांकावर अनुक्रमे पोलीस, महसूल, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या व महानगरपालिका हे विभाग असल्याचे आढळून आले आहे.

(३) लाचेच्या सापळा प्रकरणी संबंधित लोकसेवकांविरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम,

१९८८ अंतर्गत गुन्हे दाखल करुन उपलब्ध पुराव्यानुसार त्यांचेविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केली जातात.

(४) लाचखोरीला आळा बसण्यासाठी जनतेला एक मोबाईल ॲप उपलब्ध करुन दिले असून ते www.acbmaharashtra.net या सदराखाली लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या www.acbmaharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. त्याचप्रमाणे सर्वसामान्य नागरिक टोल फ्री क्रमांक १०६४ वर तक्रार नोंदवू शकतात. तसेच लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या संकेतस्थळावरील होत पेजवर Complaint या सदराखाली व www.facebook.com/maharashtra.acb या पेजवर Lodge a Complaint या सदराखाली तक्रार करण्याची सेवा उपलब्ध आहे.

---

**अमरावती येथील एका व्यावसायिकाची २ कोटी ७५ लाख रुपयांची फसवणुक केल्याबाबत**

**(४) ८८५७ (०६-०४-२०१५). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह महाराष्ट्रातील व्यावसायिकांसाठी आकर्षक कर्ज योजना सुरु असून या योजनेअंतर्गत ३० कोटी रुपयाचे कर्ज मिळवून देतो असे आमिष दाखवून अमरावती येथील एका व्यावसायिकाची २ कोटी ७५ लाख रुपयांची फसवणुक केल्याप्रकरणी मुंबईतील मरिनड्राईव्ह पोलिसांनी दि. १७ जानेवारी २०१५ रोजी एका आरोपीस अटक केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रू. २ कोटी ७५ लाख फसवणुक करण्याच्या या गुन्ह्यात आणखी काही आरोपी असल्याचे समोर आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर फसवणूकीची प्रकरणे दिवसेंदिवस वाढत असल्याने याबाबत शासनाने कोणती ठोस कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-१०-२०१५) :** (१) होय. सदर प्रकरणी मरीन ड्राईव्ह पोलीस स्टेशन येथे गुरक्र.१३९/१४ भादंवि कलम ४२०, ३४ अन्वये दिनांक १०.१०.२०१४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्यात एका आरोपीस अटक करण्यात आलेली असून त्याच्याविरुध्द मा.न्यायालयात दिनांक ०९.०१.२०१५ रोजी दोषारोपपत्र सादर करण्यात आलेले असून सदरची केस न्यायप्रविष्ठ आहे.

(२) होय, सदर गुन्ह्यामध्ये चार आरोपींचा शोध सुरु आहे.

(३) याबाबत राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे येथे आर्थिक गुन्हे शाखा व फसव्या जाहिरातील विभाग स्थापन करण्यात आला आहे. आर्थिक गुन्हे शाखा व फसव्या जाहिराती विभाग हा आर्थिक गुन्ह्यांच्या संदर्भाने फसव्या जाहिरातींना प्रतिबंध करण्यासाठी कारवाई करीत आहे. बोगस /फसव्या गुंतवणुकीबाबतच्या येजना (Fradulent Schemes) राबविणा-या बेकायदा कंपन्यांविरुध्द Maharashtra Protection of Depositors Act अंतर्गत गृह विभागाकडून कारवाई केली जाते. तसेच जिल्हा पोलीस दलाच्या वेबसाईवर खाजगी कंपन्यांकडून आर्थिक फसवणुक झाल्यासंदर्भात नागरीकांना तक्रार द्यावयांची असल्यास वेगळी

सुविधा (कम्पार्टमेंट) उपलब्ध करून देण्यात आली आहे . तसेच नागरीकांनी दिलेल्या अर्जाचा टोकन नंबर मिळण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

---

**मुंबईतील कुर्ला स्टेशन ते वाकोला ब्रीज व खार टिचर्स कॉलनी दरम्यान मोठया प्रमाणात महिला प्रवाश्यांची पाकिटे चोरीस जात असल्याबाबत**

**(५) ९००७ (०६-०४-२०१५). श्री.संजय कदम (दापोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कुर्ला स्टेशन ते वाकोला ब्रीज व खार टिचर्स कॉलनी दरम्यान मोठया प्रमाणात महिला प्रवासी वर्गाची पाकिटे चोरीस जात असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महिलांच्या पाकिटमारीच्या घटना घडू नयेत म्हणून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०९-२०१५) :** (१) पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-५, अंतर्गत कुर्ला पोलीस ठाणे हद्दीतील कुर्ला स्टेशन ते वाकोला ब्रीज दरम्यान मोठ्या प्रमाणावर महिला प्रवासी वर्गाची पाकीटे चोरीस जात असल्याबाबतच्या गुन्ह्यांची अभिलेखावर नोंद नाही.

तथापि, माहे जानेवारी, २०१५ ते दिनांक १५.०४.२०१५ चे दरम्यान एक पर्स चोरीस गेली असून प्रस्तुत प्रकरणी खेरवाडी पोलीस ठाणे येथे दिनांक २७.०२.२०१५ रोजी पोलीस ठाणेस गुरक्र. ५८/२०१५ कलम ३७९, ३४ भादंवि प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

(२) सदर घटनांस प्रतिबंध करणेसाठी पोलीस ठाणेतील गस्तीवरील वाहने, गुन्हा प्रकटीकरण पथक व सर्वेलन्स पथक यांना गस्ती दरम्यान पाकीटमारी करणारे ईसमांवर विशेष लक्ष ठेवण्याबाबत सांगण्यात आले आहे. तसेच महिला अधिकारी यंच्या नेतृत्वाखाली गस्ती पथक देखील स्थापन करण्यात आले आहे.

तसेच पोलीस ठाणे हद्दीत बिट स्तरावर बिट मार्शल महिला चार्ली, बिनतारी वाहने व पोलीस ठाणेचे अधिकारी अंमलदार यांचेमार्फत प्रभावी गस्त करण्यात येते तसेच अधुन मधुन प्रीभावी नाकाबंदी चे आयोजन करण्यात येते. पोलीस ठाणेचे अभिलेखावरील आरोपी यांची निगराणी पथकामार्फत तपासणी करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मनोर (ता. पालघर) येथील दरोड्याबाबत**

**(६) ९४५१ (०६-०४-२०१५). श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मनोर (जि.पालघर) येथे बाजारपेठेत रात्रोच्या वेळी सात ठिकाणी दुकाने / गोडाऊन फोडण्यात येऊन आतील माल चोरट्यानी दिनांक २ डिसेंबर, २०१४ रोजी पळवून नेला, हे खरे

आहे काय,

(२) तसेच माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये तलाठी कार्यालय टेण नाका येथून कपाट फोडून कॉम्प्यूटर चोरीला जाणे, वनविभागाच्या अधिका-यांच्या घरातून चोरट्यांनी लॅपटॉप व कागदपत्रांची चोरी झाल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) मनोरमध्ये सततच्या होणा-या चोरी प्रकरणी पोलीसांकडे तक्रारी करुनही अद्याप पर्यंत एकाही चोरीचा तपास लागलेला नसल्याने नागरीकांचा पोलीसांवरील विश्वास कमी झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या चोरट्यांचा बंदोबस्त करण्याबाबत कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०९-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे. सदर घटनेबाबत मनोर पोलीस स्टेशन गुन्हा रजि.क्र. १५७/२०१४ भादंवि कलम ४५७, ३८० प्रमाणे दिनांक ०२.१२.२०१४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला असून सदर गुन्ह्याचा अधिक तपास सुरु आहे.

(२) होय, हे अंशत: खरेआहे. तलाठी कार्यालय टेन नाका येथून कपाट फोडून कॉम्प्यूटर चोरीला गेलेबाबत तलाठी यांनी मनोर पोलीस स्टेशन येथे तक्रार दिलेली नाही. परंतु वन विभागाच्या अधिकारी यांचे घरातून चोराट्यांनी लॅपटॉप चोरी केलेबाबत मनोर पोलीस स्टेशन गुन्हा रजि.क्र.१२४/२०१४ भादंविक कलम ४५४, ४५७, ३८० प्रमाणे दिनांक २७.९.२०१४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

(३) हे खरे नाही. परंतु मनोर मध्ये सन २०१४ मध्ये १८ चोऱ्यांचे प्रकार घडले असून त्यापैकी ५ गुन्ह्यातील आरोपींना निष्पन्न करुन त्यांना गुन्ह्यात अटक करुन चोरीस गेलेला मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे.

(४) मनोर मध्ये झालेल्या चोऱ्यांचा तपास प्रभारी अधिकारी मनोर हे करीत आहेत. मनोर गावात पुन्हा अशा चोऱ्या होवू नयेत याकरीता सोसायटी, बिल्डींग तसेच महत्वाच्या ठिकाणी सी.सी.टी.व्ही. कॅमेरे व वॉचमन ठेवणेबाबत पोलीसांकडून सूचना दिलेल्या आहेत. महत्वाच्या ठिकाणी व्हिजीट बुके ठेवली असून ती रात्र गस्ती दरम्यान चेक करुन त्यामध्ये नोंदी घेवून सदरची व्हिजीट बुक वेळोवेळी चेक केली जातात.

मनोर हद्दीतील हिस्ट्रीशिटर व माहितगार गुन्हेगार यांना वेळोवेळी चेक करुन त्यांच्याकडून माहिती मिळविण्यात येते. तसेच अचानक नाकाबंदी व कोंबिग करुन संशयतांची तापसणी करण्यात येते. ज्या ठिकाणी घरफोडी व चोरी झालेली आहे तांत्रिक पोलीसांकडून सखोल तपास करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सातारा येथील कपील माधवराव पाटील, यांनी नोकरीचे आमिष दाखवून लाखो रुपयाची फसवणूक केल्याबाबत

**(७) १०४२६ (०६-०४-२०१५). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

१) सातारा जिल्हयातील कपील माधवराव पाटील, जी.सी ५, अश्विनी पार्क, वनवासवाडी, सातारा यांनी नोकरीचे आमिष दाखवून लाखो रुपयाची फसवणूक केल्याची तक्रार वरिष्ठ पोलिस निरीक्षक, कफ परेड, पोलिस ठाणे, मुंबई यांच्याकडे दिनांक १७ एप्रिल, २०१४ रोजी केली आहे, हे खरे आहे काय,

२) असल्यास, सदर तक्रारी वरुन कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०९-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) प्रकरणी अर्जदार यांनी गैरअर्जदाराविषयी पोलीसांना कोणत्याही प्रकारची माहिती दिलेली नाही, तसेच सदरचा अर्ज हा दोन वर्षानंतर पोलिस ठाणेस सादर केला आहे.

अर्जदार यांनी स्वत:च्या मालकी, हक्काच्या गाळ्याची विक्री करुन बळीत व्यक्तींना स्वखुशीने इशारा पावती करुन त्यांचे पैसे परत देण्यासंबंधी तजबीज ठेवली आहे. यावरुन सदरच्या अर्जात काहीही तथ्य वाटत नसल्याने पोलीसांमार्फत अर्ज दफ्तरी दाखल करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जलसंपदा खात्यातील भ्रष्टाचाराच्या सर्व प्रकरणांची चौकशी करण्याच्या घोषणेबाबत

**(८) १४२९३ (०८-०४-२०१५). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जलसंपदा खात्यातील भ्रष्टाचाराच्या सर्व प्रकरणांची चौकशी करण्याची घोषणा मा.मुख्यमंत्री यांनी केली असली तरी जलसंपदा विभागाने केवळ कोकण विभागीय मंडळाची १२ आणि विदर्भातील गोसीखुर्द प्रकल्पातील भ्रष्टाचाराची चौकशी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे सोपविली असल्याची माहिती दिनांक १२ फेब्रुवारी, २०१५ च्या सुमारास उजेडात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जलसंपदा खात्यातील भ्रष्टाचाराच्या सर्व प्रकरणांची चौकशी करण्याची घोषणा मा.मुख्यमंत्री यांनी करुनही मोजक्याच सिंचन प्रकरणी चौकशी करण्यामागील कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उर्वरित जलसंपदा खात्यातील भ्रष्टाचाराची चौकशी करण्याबाबत राज्य शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, प्रश्न भाग - ३ बाबत कोणतीच कार्यवाही होत नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-९-२०१५) :** (१), (२), (३) व (४) श्री. प्रविण वाडेगांवकर यांच्या दिनांक २०/०८/२०१४ च्या निवेदनात नमूद कोकण पाटबंधारे विकास महामंडळातंर्गत मंजूरी दिलेल्या १२ प्रकल्पांमधील अनियमिततेची उघड चौकशी करण्यात शासन आदेश दिनांक १३.१२.२०१४ अन्वये मंजूरी देण्यात आली आहे. त्यानुसार उघड चौकशी क्रमांक १८२/२०१४ अन्वये कोकण भागातील ३ सिंचन प्रकल्पांची चौकशी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे यांचेमार्फत सुरु आहे.

मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठ येथे दाखल जनहीत क्र. ९२/२०१२ व जनहित याचिका क्र. ८३/२०१२ मध्ये नमूद केलेल्या विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या प्रकल्पांमधील अनियमिततेच्या संदर्भात उघड चौकशी करण्यास शासन आदेश दिनांक १८.०२.२०१५ अन्वये परवानगी देण्यात आली आहे. त्यानुसार पहिल्या टप्प्यामध्ये गोसीखुर्द प्रकल्प, निम्न पैनगंगा प्रकल्प यवतमाळ, जिगाव प्रकल्प-बुलढाणा या प्रकल्पांची चौकशी करण्यात येत आहे. टप्पया-टप्प्याने सर्व प्रकल्पांची चौकशी करण्याचे प्रस्तावित आहे.

---

**राज्यातील नक्षलवादी, माओवादी कारवाया रोखण्याबाबत**

**(९) १६८१८ (१०-०८-२०१५). अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नक्षलवाद्यांविरोधातील मोहिमेत मागील १५ वर्षात पोलिसांनी केवळ ६८ नक्षलवाद्यांना ठार केले असून प्रत्यक्षात नक्षलवादी, माओवादी यांनी १२१ पोलिसांची हत्या केली तर १७३ जणांना पोलिसांचे खबरे समजून ठार मारले असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने नक्षलवादी, माओवादी कारवाया रोखण्यासाठी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-१०-२०१५) :** (१) राज्यातील नक्षलवादी विरोधी मोहिमेत मागील १५ वर्षात ११३ नक्षलवाद्यांना ठार करण्यात आले असून १५९ पोलीस जवान शहीद झाले आहेत. तसेच ३६७ नागरीक ठार झाले असून त्यापैकी २२४ नागरिकांना पोलीस खबरे म्हणून ठार करण्यात आले आहे.

(२) नक्षलवाद्यांच्या कारवाया रोखण्यासाठी शासनाने पुढीलप्रमाणे उपाययोजना केल्या आहेत:-

१) शासनाने नक्षलवाद्यांचा मुकाबला करण्यासाठी आवश्यक ती शस्त्रे व दारुगोळा याबरोबर आधुनिक संपर्क व्यवस्था, वाहन व्यवस्था, भुसूरुंग प्रतिबंधक वाहने व हेलिकॉप्टर उपलब्ध करुन दिले आहेत.

२) जिल्हयातील नक्षलवाद्यांच्या कारवायांवर अंकुश लावण्यासाठी जिल्हा पोलीस तसेच

केंद्रीय राखीव पोलीस बल यांच्या माध्यमातून नक्षलविरोधी अभियान राबविण्यात येते. तसेच एरिया डॉमिनेशन कार्यवाही करुन नागरीकांना सुरक्षा प्रदान करण्यात येत आहे.

३) जिल्ह्यात नक्षलविरोधी कृतीकरिता केंद्रीय राखीव पोलीस बलाच्या बटालियन, कोब्रा बटालियन, राज्य राखीव पोलीस बलाच्या कंपन्या व जिल्हा पोलीस दल तसेच सी-६० च्या तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत. या जवांनाना युध्दप्रशिक्षण देण्यासाठी व्यवस्था करण्यात आली आहे.

४) नक्षलविरोधी शोध अभियान, गस्त, नाईट ॲम्बुश, नाकाबंदी यामुळे नक्षलवाद्यांच्या हालचालीवंर प्रतिबंध आणण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात रस्त्यांवर होणारे लहान मुलांचे अपघात टाळण्याबाबत**

**(१०) १६९३७ (१२-०८-२०१५). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वाहतुक कोंडी, रस्त्यांची स्थिती आणि बेदरकारपणे वाहतुकीचे नियम मोडून गाडी चालविणा-या चालकांमुळे दिवसेंदिवस रस्ते अपघातांत भर पडत असून गेल्या वर्षभरात ४३४ चिमुरड्यांना अपघातांत जीव गमवावा लागल्याचे सेव्ह लाइफ फाउंडेशने माहितीच्या अधिका-याच्या माहितीतून माहे मे, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रस्त्यांवर वारंवार होणारे लहान मुलांचे अपघात टाळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०९-२०१५) :** (१) राज्यातील रस्ते अपघातात प्रतिवर्षी घट होत आहे. तसेच, सन २०१४ मध्ये ०-१४ या वयोगटातील ४३४ मुलांचा रस्ते अपघातात मृत्यू झाला असल्याची माहिती एप्रिल, २०१५ मध्ये माहिती अधिकारात देण्यात आलेली आहे.

(२) व (३) या अपघातातील बहुतांश मुले ही त्यांचे पालक/नातेवाईक यांच्यासह प्रवास करताना मयत झालेली आहेत.

मुंबई पोलीसांच्या वाहतूक शाखेतील शिक्षण विभागामार्फत कायमस्वरुपी व फिरते वाहतूक पार्कच्या माध्यमातून शालेय विद्यार्थ्यांना वाहतूकीचे नियम, रस्ता सुरक्षिततेचे ज्ञान, रस्त्यावर पादचाऱ्यांनी पाळवयाचे नियम व काळजी यांचे प्रात्यक्षिकासह शिक्षण दिले जाते तसेच राज्यात दरवर्षी होणाऱ्या रस्ता सुरक्षा अभियानामध्ये शालेय विद्यार्थ्यांना सहभागी करुन घेतले जाते.याशिवाय महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाच्या इयत्ता ९ वी च्या क्रमिक पाठ्यपुस्तकांमध्ये रस्ते सुरक्षितता व इतर उपयुक्त सामाजिक बाबींचा समावेश करण्यात आला आहे.

---

**अहमदनगर-औरंगाबाद मार्गावरील चंदन तस्करांना केलेली अटक**

**(११) १७०३६ (१०-०८-२०१५). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर-औरंगाबाद मार्गावरील हॉटेल महाराजासमोर एका कार मधून १९० कि.ग्रा. चंदनाची चोरी पोलीसांनी दिनांक ८ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास पकडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०९-२०१५) :** (१) दि.८.५.२०१५ रोजी अहमदनगर-औरंगाबाद मार्गावरील हॉटेल महाराजासमोर एका कारमध्ये १९० कि.ग्रॅ वजनाचे चंदनाचे ९ ओंडके पोलीसांनी पकडले. यामध्ये रु. ४,३४,७००/- किंमतीचे चंदन व ७लाख किंमतीची स्विफ्ट कार असा एकूण रु. ११,३४,७००/- किंमतीचा माल पोलीसांनी जप्त केला आहे.

(२) या प्रकरणी पोलीसांनी केलेल्या चौकशीमध्ये आरोपींनी चंदनाची लाकडे चोरुन विनापरवाना विक्री करण्याच्या उद्देशाने घेऊन जात असल्याचे आढळून आले आहे. या प्रकरणी ३ अरोपीविंरुध्द तोफखाना पोलीस स्टेशन, अहमदनगर येथे भा.दं.वि. कलम ३७९, ३४ सह भारतीय वन कायदा १९७२ कलम ४२ व महाराष्ट्र वन अधिनियम, कलम ३१४ प्रमाणे गु.र.नं ११६/२०१५ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. सदर प्रकरण सध्या न्यायप्रविष्ठ आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शिवडीच्या (मुंबई) जुना पोस्ट ऑफिस मैदानामध्ये कर्तव्य बजावत असलेल्या पोलीस शिपयाला ५ जणांनी बेदम मारहाण केल्याबाबत**

**(१२) १७३३६ (१२-०८-२०१५). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिवडीच्या (मुंबई) जुना पोस्ट ऑफिस मैदानामध्ये कर्तव्य बजावत असलेल्या ३५ वर्षीय पोलीस शिपायाला ५ जणांनी बेदम मारहाण केल्याचे दिनांक १९ एप्रिल, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-१०-२०१५) :** (१) व (२) सदर घटना दि. १८.४.२०१५ रोजी घडली असून र.अ.किडवाई मार्ग पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद क्र. १८७/२०१५ कलम १४१, १४३, १४७, १४९ ३२३, ३३३, ३५३, ५०४, ५०६ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून ५ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. गुन्ह्याचा तपास चालू आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुण्यातील लक्ष्मी रस्ता परिसरातील अनेक सराफी**
**दुकानात मदतपेट्या ठेवण्यात आल्याबाबत**

**(१३) १७६१९ (१०-०८-२०१५). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील सिंहगड रस्त्यावरील एका प्रख्यात सराफी दुकानात सोने खरेदी करण्यासाठी गेलेल्या एका तरुणाने त्याच्या स्वत:च्या आजीचा फोटो मदतीसाठी रक्कम गोळा करण्यासाठी असलेल्या मदतपेटीवर पाहिला आणि मदतीच्या नावाखाली चाललेला स्वयंसेवी संस्थेचा (एनजीओचा) गैरप्रकार माहे मे, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आणला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुण्यातील लक्ष्मी रस्ता परिसरातील अनेक सराफी दुकानात अशा प्रकारच्या मदतपेट्या ठेवण्यात आल्या असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-१०-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.

पुणे जिल्ह्यातील सिंहगड रस्त्यावरील एका प्रख्यात सराफी दुकानात सोने खरेदी करण्यासाठी गेलेल्या एका तरुणाने त्याच्या स्वत:च्या आजीचा फोटो मदतीसाठी रक्कम गोळा करण्यासाठी असलेल्या मदतपेटीवर पाहिला. याबाबत त्याने सिंहगड रोड पोलस स्टेशन येथे तक्रार अर्ज दिला असता सिंहगड रोड पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र.९१८/२०१५, भा.दं.वि. कलम ८९९, ५०१ अन्वये अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर तक्रारअर्जाच्या अनुषंगाने चौकशी केली असता आंतरराष्ट्रीय अनुषंगाने चौकशी केली असता आंतरराष्ट्रीय दिर्घायु केंद्र, पाषाणरोड या संस्थेने मदत पेटी ठेवल्याचे निष्पन्न झाले. ही संस्था गरजु वयोवृध्द लोकांना वैद्यकीय कारणास्तव मदत करते.

सदर संस्थेने पुर्वी आयोजित केलेल्य कार्यक्रमातील फोटो मदतपेटीवर लावल्याचे आढळून आले. या प्रकरणी कोणताही फसवणुकीचा प्रकार आढळून आलेला नाही. या संस्थेने आतापर्यंत २० ते २५ वयोवृध्द महिलांना मदत केल्याचे आढळून आले.
(२) पुण्यातील लक्ष्मी रस्ता परिसरातील अनेक सराफी दुकानात अशा प्रकारच्या मदतपेट्या ठेवण्यात आल्याबाबत कोणत्याही तक्रारी दाखल न झाल्याचे आढळून आले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे शहरातील देहुरोड पोलिस ठाण्याच्या हद्दीमध्ये गुन्ह्यांच्या संख्येत वाढ झाल्याबाबत

**(१४) १७६३१ (१२-०८-२०१५). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.काशिराम पावरा (शिरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील देहुरोड पोलिस ठाण्याच्या हद्दीमध्ये बलात्कार, विनयभंग, घरफोडी, सोनसाखळी चोरी यासारख्या गुन्ह्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याने वाढत्या गुन्हेगारीच्या निषेधार्थ दिनांक २७ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमरास सर्वपक्षीय कार्यकत्याच्या वतीन आंदोलन करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-१०-२०१५) :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे येथील पिंपरी-चिंचवड शहरामध्ये विविध गुन्हयामध्ये वाढ झाल्याबाबत

**(१५) १८१५५ (१०-०८-२०१५). श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील पिंपरी-चिंचवड शहरामध्ये गेल्या तीन महिन्यात महिला अत्याचाराच्या घटनांमध्ये वाढ होवून बलात्काराच्या २६, विनयभंगाच्या ९२ घटना घडल्या असून जबरी चोरी, दुचाकी चोरी, खून व खुनाचा प्रयत्न अशाप्रकारच्या एकूण ९२८ दखलपात्र गुन्ह्यांच्या नोंदी झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बलात्काराच्या व विनयभंगाच्या व इतर घडलेल्या गुन्ह्याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-१०-२०१५) :** (१) पिंपरी चिंचवड शहरातील पिंपरी, चिंचवड, निगडी, भोसरी व एमआयडीसी भोसरी या पोलीसाठाणच्या कार्यक्षेत्रात गेल्या ३ महिन्यात (माहे मे ते

जुलै, २०१५) बलात्काराचे १३ गुन्हे, विनयभंगाचे ३३ गुन्हे, जबरी चोरीचे ३२ गुन्हे, दुचाकी चोरीचे ९७ गुन्हे खुनाचे ६ गुन्हे खुनाचा प्रयत्नाचे ८ गुन्हे व इतर ३४५ गुन्हे असे एकूण ५३४ गुन्हे दाखल आहेत.
(२) होय.
(३) बलात्काराच्या १३ गुन्ह्यातील १३ आरोपींना अटक केली आहे. विनयभंगाचे ३३ गुन्ह्यातील ३२ आरोपींना अटक केली आहे. जबरी चोरीचे ३२ गुन्ह्यापैकी २३ गुन्हे उघडकीस आले असून, ३४ आरोपींना अटक करण्यात आली आहे. दुचाकी चोरीचे ९७ गुन्ह्यांपैकी १० गुन्हे उघडकीस आले असून, १२ आरोपींना अटक करण्यात आली आहे. खुनाचे एकूण ६ गुन्हे दाखल असून, गुन्ह्यातील ७ आरोपींना अटक करण्यात आली आहे. खुनाचा प्रयत्नाचे ८ गुन्ह्यातील ७ गुन्हे उघडकीस आले असून, २७ आरोपींना अटक करण्यात आली आहे. इतर ३४५ गुन्ह्यांपैकी १८७ गुन्हे उघडकीस आले असून ४६६ आरोपींना अटक करण्यत आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शासनाने राज्यात १६० सेवा तातडीने देण्याचा निर्णय घेतल्याबाबत**

**(१६) १८८४१ (०६-०८-२०१५). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.सुधाकर भालेराव (उदगीर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पाणी जोडणी, नवीन रेशनकार्ड, जन्ममृत्यु दाखला, जेष्ठता प्रमाणपत्र, रहिवासांचे (डोमिसाईल) प्रमाणपत्र, जातीचा दाखला, मालमत्ता कर, देयक प्रमाणपत्र, नवीन मालमत्ता नोंदणी, रुग्णालयाची नोंदणी, नुतनीकरण परवाना, सहकार संस्था नोंदणी, उत्पन्न प्रमाणपत्र अशा १६० सेवा तातडीने देण्याचा निर्णय शासनाने माहे एप्रिल, २०१५ च्या शेवटच्या सप्ताहात घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) या योजनेची थोडक्यात रुपरेषा काय आहे,
(३) ही योजना केव्हापासून अंमलात आणण्यात येईल,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०९-२०१५) :**(१), (२), (३) व (४) महाराष्ट्र राज्यात पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोजित लोकसेवा देणे हा सदर योजनेचा उद्देश आहे. यासदर्भातील महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, २०१५ प्रख्यापित करण्यात आला आहे. सदर अध्यादेश दिनांक २८ एप्रिल, २०१५ च्या राजपत्रात अधिसूचित करण्यात आला असून तो तात्काळ लागू झाला आहे. सदर अध्यादेशातील खंड ३ (१) मधील तरतूदीनुसार प्रत्येक सार्वजनिक

प्राधिकरणाने, या अध्यादेशाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत आणि त्यानंतर वेळोवेळी, ते पुरवित असलेल्या लोकसेवा, पदनिर्देशित अधिकारी प्रथम व व्दितीय अपील प्राधिकारी आणि नियत कालमर्यादा अधिसूचित करणे आवश्यक आहे.

---

**राज्यातील धर्मादाय संस्था नोंदणी कायद्याखाली**
**नोंदणी केलेल्या कार्यरत नसल्याबाबत**

**(१७) १९४१० (१२-०८-२००५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.विलासराव जगताप (जत) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील धर्मादाय संस्था नोंदणी कायद्याखाली नोंदणी केलेल्या ३ लाख ४ हजार सार्वजनिक संस्था (पब्लिक ट्रस्ट) कार्यरत नसल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संस्था कार्यरत नसलेल्या संस्थांची नोंदणी रद्द करण्यासाठी धर्मादाय संस्था नोंदणी कायद्याअंतर्गत अनेक जाचक अटी असल्याकारणाने त्याचा भार धर्मादाय आयुक्त कार्यालयावर येत असल्याचे ही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासन कार्यरत नसलेल्या संस्थांची नोंदणी रद्द करण्यासाठी धर्मादाय संस्था नोंदणी कायद्यामध्ये बदल करणार आहे काय,

(४) तसेच, धर्मादाय आयुक्त कार्यालयामध्ये विविध वर्गातील रिक्त असलेली पदे शासन केव्हापर्यंत भरणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०९-२०१५) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) यानुषंगाने महाराष्ट्र विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० या कायद्यामध्ये दुरुस्तीचा प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन आहे.

(४) व (५) रिक्त पदे भरण्याची कार्यवाही शासन तसेच धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडून करण्यात येत आहे.

---

**मालेगाव (जि.नाशिक) येथील मसगा महाविद्यालयात विद्यार्थीनीची छेड**
**काढून तिचा विनयभंग करुन ॲसिड फेकण्याची धमकी दिल्याबाबत**

**(१८) १९५५० (१२-०८-२०१५). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगाव (जि.नाशिक) येथील मसगा महाविद्यालयात एफवायबीएस्सीचा पेपर लिहित असलेल्या विद्यार्थीनीची छेड काढून तिचा विनयभंग करुन ॲसिड फेकण्याची धमकी एका इसमाने दिली असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे

खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार विद्यार्थीनीशी छेडछाडी करणाऱ्या सदरील इसमावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-१०-२०१५) :** (१) होय.

(२) होय.

(३) कॅम्प पोलीस स्टेशन मालेगाव येथे गुरनं.५५/२०१५ भादवि कलम ३५४ (ड), ५०६, प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोपत्र पत्र दाखल करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालेगांव ता.जि.नाशिक येथे धर्मदाय आयुक्तांचे सब कार्यालय सुरु करण्याबाबत**

**(१९) १९५५२ (१२-०८-२०१५). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :**सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव ता.जि.नाशिक येथे अंदाजे १० हजार धर्मादाय नोंदणी ट्रस्ट आहे परंतु धर्मादाय कार्यालय हे नाशिकला आहे नाशिक व मालेगांव हे अंतर १०० कि.मी. असल्याने ट्रस्टची कार्यालयीन कामे करण्याकरिता नाशिक येथे जावे लागत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कारणास्तव धर्मादाय आयुक्तांचे सब कार्यालय मालेगांव येथे करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करीत आहे ,

(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०९-२०१५) :**(१) हे खरे आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन आहे.

---

**मुंबई उच्च न्यायालयाचे कोल्हापूर येथे खंडपीठ स्थापर करण्यासाठी शिफारशी करण्याकरिता ३ न्यायमूतीची समिती गठीत करण्यात आली आहे,**

**(२०) १९७२२ (१०-०८-२०१५). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.अनिल बाबर (खानापूर), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उच्च न्यायालयाचे कोल्हापूर येथे खंडपीठ स्थापन करण्यासाठी शिफारशी करण्याकरिता ३ न्यायमूर्तीची समिती गठीत करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू समितीने अहवाल सादर केला आहे काय, व त्यातील प्रमुख शिफारस काय आहे,
(३) तसेच या मागणीसंदर्भात राज्य शासनाने आपले मत उच्च न्यायालयास कळविले आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त मागणीसंदर्भात राज्य शासनाची काय भूमिका आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०९-२०१५) :** (१) मुंबई उच्च न्यायालयाचे नवीन खंडपीठा राज्यात कोठे स्थापन करावे याची निश्चिती करण्यासाठी ३ न्यायमुर्तींची समती गठित करण्यात आली आहे.
(२) सदर समितीचा अहवाल अद्यापि अप्राप्त आहे.
(३) होय.
(४) राज्यात विविध भागातून असलेल्या मागणीनुसार उच्च न्यायालयाचे नवीन खंडपीठा स्थापन करण्यास बराचसा कालावधी लागू शकतो, ही बाब विचारात घेवून कोल्हापूर येथे मुंबई उच्च न्यायालयाचे फिरते खंडपीठ (सर्किट बेंच) स्थापन करण्यास मान्यता देण्यात यावी तसेच पुणे येथेही मुंबई उच्च न्यायालयाचे फिरते खंडपीठ (सर्किट बेंच) स्थापन करण्याबाबत सरकारात्मक विचार करण्यात याव अशी शिफारस मा.मुख्य न्यायमूर्ती उच्च न्यायालय, मुंबई यांना करण्यत आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उरणमार्गे मुंबई-गोवा महामार्गाला जोडणा-या चिरनेर दिघाटी खिंडीतून जड कंटनेर वाहतुकीचे प्रमाण वाढल्याने अपघाताचे प्रमाण वाढल्याचे निदर्शनास आल्याबाबत**

**(२१) १९८२२ (०६-०८-२०१५). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उरणमार्गे मुंबई-गोवा महामार्गाला जोडणा-या चिरनेर दिघाटी खिंडीतून जड कंटनेर वाहतुकीचे प्रमाण वाढल्याने अपघाताचे प्रमाण वाढल्याचे माहे एप्रिल, २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रस्त्यावरील अपघाताचे प्रमाण रोखण्याकरिता व वाहतुकींवर नियंत्रण ठेवण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०९-२०१५) :** (१) मुबई-गोवा महामार्गाला जोडणाऱ्या चिरनेर दिघाटी या मार्गावर रस्त्यांच्या साईड पट्टया वाढविण्यात आल्याने, तसेच खारपाडा या भागात कंटेनर यार्ड असल्याने खिंडीतून कंटेनर वाहतूकीचे प्रमाण वाढले आहे. तथापि, अपघाताचे प्रमाण वाढलेले नाही. या ठीकाणी सन २०१३ मध्ये १, सन २०१४ मध्ये व जुलै, २०१५ अखेर दोन अपघात झाले आहेत.

(२) या मार्गावर उपघात होऊन नये याकरीता खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

१. वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्याकरीता उरण व नवी पनवेल वाहतूक शाखेकडील प्रत्येकी दोन पोलीस कर्मचारी महामार्गावर गस्तीकरीता नियमितपणे ठेवण्यात येतात.

२. महामार्गावरील गावे/शाळा/चौक या ठिकाणी गतिरोधक/सूचना फलक लावण्यात आले आहेत.

३. चिरनेर खिंडीत वळणाच्या ठिकाणी सूचना फलक/दिशदर्शक फलक लावण्यात आले आहेत. तसेच, रस्त्यांच्या मध्य ठिकाणी पांढरे पट्टे मारण्यात आले आहेत.

४. नवी मुंबई वाहतूक शाखेकडून हेल्पलाईन कार्यान्वित केलेली असून महामार्गावर अपघात किंवा वाहने बंद पडल्यास वाहतूक पोलीस कर्मचारी क्रेनच्या सहाय्याने वाहने बाजूस करुन वाहतूक सुरळीत ठेवतात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अनसरवाडा ता.निलंगा, जि.लातूर येथील महिला सरपंच तनुजा पटसाळगे व इतर ६ जणांवर गुंडानी हल्ला केल्या**

**(२२) २०३६९ (१०-०८-२०१५). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनसरवाडा ता.निलंगा, जि.लातूर येथील महिला सरपंच तनुजा पटसाळगे व इतर ६ जणांवर गुंडानी हल्ला केल्याची दिनांक २८ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास घटना घडली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी पोलिसांनी केलेल्या तपासात काय आढळून आले व त्यानुसार संबधितांवर कोणती कारवाई करण्यात आली,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०९-२०१५) :** (१) होय.

(२) सदर प्रकरणी विनापरवाना ध्वजासाठीचा कट्टा बांधण्याच्या कारणावरुन झालेल्या हाणीमारीबाबत निलंगा पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ३७/२०१५ कलम १४३,१४७,१४८,१४९,३३६,३३७,३२४,३२३,५०४ भादंवि सह कलम ३(१) (आर)(एस) अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील एकूण २१ आरोपींना अटक करण्यात आली आहे. मा.न्यायालयात गुन्ह्याचे दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## म्हैसगाव (ता.राहुरी, जिल्हा अहमदनगर) येथील महिला सरपंचावर ॲसिड फेकण्यात आल्याबाबत

**(२३) २०३९० (१२-०८-२०१५). श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हैसगाव (ता.राहुरी, जिल्हा अहमदनगर) येथील ग्रामसभेत दारुबंदीचा ठराव संमत झाल्यानंतर दारुविक्री बंद करावी असे सांगण्यास गेलेल्या महिला सरपंच सुजात पवार सह अन्य महिलांवर दारुविक्री करणाऱ्या महिलेने ॲसिड फेकल्याचे दिनांक १८ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०९-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) म्हैसगाव (ता.राहुरी, जि.अहमदनगर) येथील ग्रामसभेत दारुबंदीच्या ठराव संमत झाल्यानंतर दारुविक्री बंद करावी असे सांगण्यास गेलेल्या महिला सरपंच सुजाता पवार सह अन्य महिलांवर दारुविक्री करणाऱ्या महिलेले ॲसिड फेकण्याचा प्रयत्न केल्याचे दि. १६.५.२०१५ रोजी राहुरी पोलीस ठाण्यात तसेच वेगवेगळ्या प्रसारमाध्यमाकडे महिला सरपंचांनी अर्ज दिले होते. सदर अर्जांच्या अनुषंगाने दि. १७.५.२०१५ रोजी दारु विकणाऱ्या महिलेच्या घराचीझडती घेतली असता तिच्या घरात कोणत्याही प्रकारचा संशयित माल मिळून आला नाही. तसेच महिला पंच व त्यांच्या सोबतच्या महिलांच्या अंगावर कोणत्याही प्रकारच्या जखमा आढळून आलेल्या नाहीत. सदरची खोटी बातमी छापण्यास नकार दिल्यामुळे दि.१७.५.२०१५ रोजी म्हैसगाव येथील बाजारतळावर महिला सरपंचाच्या पतीने स्थानिक पत्रकारांना शिवीगाळ करुन मारहाण करण्याची धमकी दिल्याचा तक्रार अर्ज दिला आहे. तसेच पत्रकारांनी देखील शिवीगाळ केल्याचे तक्रार अर्ज महिलांनी दिले आहेत. एकूणच सदरची कृती प्रसिध्दी मिळविण्यासाठी करण्यात आल्याचे निष्पन्न झाले आहे. तथापि, खबरदारीचा उपाय म्हणून गैरअर्जदार महिलेच्या विरुध्द प्राप्त झालेल्या तक्रारीवरुन राहुलरी पोलीस ठाणे येथे अदखलपात्र गु.र.नं. ३१४/२०१५ भांदविक ५०४, ५०६ प्रमाणे गुन्हा दाखल असल्याने प्रतिबंधक कारवाई प्रस्ताव क्र. ८७/२०१५ सीआरपीसी कलम १०७ प्रमाणे प्रतिबंधक कारवाई करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर शहरातील विविध भागात एकाच दिवशी तिघांचे खुन करण्यात आल्याबाबत**

**(२४) २०६९० (१२-०८-२०१५). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील विविध भागात एकाच दिवशी दिनांक २५ मे, २०१५ रोजी तिघांचे खुन करण्यात आले असून या घटनांमुळे तेथील कायदा व सुव्यवस्था धोक्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, त्यात काय आढळून आले व तद् नुसार संबंधितांविरुध्द कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही.

दिनांक २५ मे, २०१५ रोजी दोन खुनाचे गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

(२) व (३) सदर प्रकरणी चौकशी केली असता दोन खुनाच्या घटना घडल्या आहेत. पहिली घटना हिवरी लेआऊट येथे घडली असून मृतकाचा डोक्यावर दगड मारुन खुन करण्यात आला आहे. याप्रकरणी फिर्यादीने दिलेल्या रिपोर्टवरुन पोलीस स्टेशन नंदनवन येथे गु.र.क्र. १९४/२०१५ भा.दं.वि. कलम ३०२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदरचा गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

दुस-या प्रकरणी दोन इसमांमध्ये झालेल्या भांडणावरुन मृतकाचा छातीत चाकू भेसकून खुन करण्यात आला. य प्रकरणी फिर्यादीच्या तक्रारीवरुन पोलीस स्टेशन नंदनवन येथे गु.र.क्र.१९६/२०१५, भा.दं.वि. कलम ३०२ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून आरोपीस अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून सदर गुन्ह्यात वापरण्यात आलेला चाकू जप्त करण्यात आला आहे. सदरचा गुन्हादेखील न्यायप्रविष्ठ आहे.

---

**कोथळी (ता.करवीर, जि.कोल्हापूर) येथे एका महिलेवर तिच्या पतिसमोर केलेल्या बलात्काराबाबत**

**(२५) २०७६१ (१२-०८-२०१५). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोथळी (ता.करवीर, जि.कोल्हापूर) येथे मोटार सायकलवरुन नातेवाईकांकडे जात असतांना एका महिलेवर तिच्या पतीसमोर नंदकुमार पाटील व त्याच्या सहकाऱ्याने दिनांक १८ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास बलात्कार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पिडीत महिलेच्या पतीला बेदम मारहाण करुन पीडीत महिलेच्या आईला आपण पोलिस असल्याचे सांगून खंडणी उकळल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पोलिसांनी संबंधित घटनेची चौकशी करुन या प्रकणातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-१०-२०१५) :** (१) व (२) दि.१५.५.२०१५ रोजी फिर्यादी महिला ॲक्सेसे मोटर सायकलवरुन तसेच सोबत पती स्प्लेंडर मोटर सायकलवरुन पाहुण्यांकडे जात असताना रात्री ८.३० वा कोथळी, ता.करवीर गावचे हद्दी फिर्यादी महिलेने व पतीने मोटर सायकल थांबवली असताना पाठी मागुन दोन मोटर सायकलवरील चार आरोपी मारहाण करुन जमीनीवर पाडले व फिर्यादीस ऊसाच्या शेतात ओढत नेत असताना आरडा ओरड केल्याने अन्य आरोपींनी असे करु नकोस म्हणून सांगितले. एक आरोपी फिर्यादी महिलेच्या ओळखीचे प्रवासी वाहतूक वडाप जीपचा चालक होता. आरोपीने फिर्यादी महिलेस ऊसाच्या शेतात घेवून जावून जबरदस्तीने जबरीसंभोग केला व फिर्यादी महिलेने आरोपीच्या हातातून सुटका करुन घेऊन पतीसह घरी परत आले.

दि.१६.५.२०१५ रोजी कोथळी, ता.करवीर येथील एका इसम घरी येवून दि.१५.५.२०१५ रोजी रात्री फिर्यादीच्या एक्सेस मोटार सायकलने त्याच्या मोटार सायकलीस धडकून त्यांच्या मोटार सायकलचे रु.१५००/- चे नुकसान केले आहे व मी पोलीस आहे असे म्हणून सदरचे प्रकरण मिटवून घेण्यासाठी फिर्यादीच्या आईकडून रु.१०००/- घेतले असल्याचे फिर्यादीने सांगितले.
(३) फिर्यादी महिलेने दिलेल्या फिर्यादीवरुन करवीर पोलीस ठाणे भाग ५ गु.र.नं.१९२/२०१५ भा.द.वि.स. कलम ३७६, ३२३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीस अटक करण्यात आले असून. आरोपी विरुध्द मा.प्रथमवर्ग न्याय दंडाधिकारी, कोर्ट नं.१ कोल्हापूर येथे दोषारोप पत्र दाखल केले आहे. सदर गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**श्रीवर्धन (जि.रायगड) तालुक्यातील कारीवणे खाडीत बेकायदा वाळू उत्खन्न करणा-या वाळू माफियांनी पोलीस व महसूल कर्मचाऱ्यांना मारहाण केल्याबाबत**

**(२६) २०७७० (१०-०८-२०१५). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्रीवर्धन (जि.रायगड) तालुक्यातील कारीवणे खाडीत बेकायदा वाळू उत्खनन सुरू असतांना वाळू माफियांना रंगेहाथ पकडणाऱ्या पोलीस व महसूल कर्मचाऱ्यांना वाळू माफियांनी मारहाण केल्याचे दिनांक २५ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पोलिसांनी या प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०९-२०१५) :** (१) होय, तथापि, सदर घटना दि. २१.५.२०१५ रोजी घडली आहे.
(२) सदर प्रकरणी दि २१ मे, २०१५ रोजी श्रीवर्धन पोलीस ठाणे येथे दखलपात्र गुन्हा नोंद क्र. २०/२०१५ भादंविसं कलम ३५३,३३२,४०१,३७९,२२४,१४३,१४७,५०४,५०६ भारतीय पर्यावरण अधिनियम, १९८६ चे कलम १५ प्रमाणे गुन्हा दाखल आहे. सदर गुन्ह्यातील आठ आरोपीपैकी एका आरोपीस दि. ११ ऑगस्ट, २०१५ रोजी अटक करण्यात आली असून इतर ७ आरोपींना न्यायालयाने दि. ५ ऑगस्ट, २०१५ रोजी अटकपूर्व जामिन मंजूर केला आहे. गुन्ह्याच्या तपास चालू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पारनेर (जिल्हा अहमदनगर) येथील माजी सभापती यांच्यावर झालेल्या प्राणघातक हल्याबाबत**

**(२७) २०७७७ (१०-०८-२०१५). श्री.विजय औटी (पारनेर), श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पारनेर (जिल्हा अहमदनगर) येथील माजी सभापती श्री.सुदाम पवार यांच्यावर दोन गटातील वादातून दिनांक १३ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास कोहोकडे शिवारात चार जणांनी तलवारीने प्राणघातक हल्ला केला हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०९-२०१५) :** (१) होय.
(२) सदर प्रकरणी दि. १३ मे, २०१५ रोजी पारनेर पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद क्र. १७०/२०१५ अंतर्गत भारतीय दंडविधान संहितेच्या कलम ३०७, ३९५ व आर्म ॲक्टच्या कलम ४/२५ प्रमाणे तीन आरोपीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यच्या तपासात एका आरोपीस अटक करण्यात आली असून उर्वरित दोन आरोपींच्या शोध सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खालापूर तालुक्यातील (जि.रायगड) ॲडलॅब इमॅजिका या थिम पार्कचा व्यवस्थापकाने महिला कर्मचा-याचा विनयभंग केल्याबाबत**

**(२८) २०९९२ (१२-०८-२०१५). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खालापूर तालुक्यातील (जि.रायगड) ॲडलॅब इमॅजिका या थिम पार्कचा व्यवस्थापक रोहित

सिंग याने दिनांक २४ एप्रिल २०१५ रोजी एका महिला कर्मचा-याचा विनयभंग केल्याची घटना घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-१०-२०१५) :** (१) होय.

(२) होय.

(३) सदरचा गुन्हा मौजे ॲडलॅब इमॅजीका कंपनीमधील ओमेगा कन्स्ट्रक्शन रुम नं. ५०३ शिळगांव, खोपोली ता.खालापूर येथे दि.२४.४.२०१५ रोजी घडला आहे. यातील आरोपी हे त्यांचे घरी कन्स्ट्रक्शनबाबत चर्चा करावयाची आहे असे फिर्यादी महिला कर्मचाऱ्यास सांगून बोलावून घेवून फिर्यादी महिला कर्मचाऱ्यांच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले म्हणून फियार्दी महिलेने दिलेल्या फिर्यादीवरून खोपोली पोलीस ठाणे १ कॉ.गु.र.नं. ६८/२०१५, भा.दं.वि कलम ३५४ अ (१) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला असून, आरोपीस अटक करण्यात आले आहे गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुरुडेश्वर देवस्थान समिती (ता.मुरुड जि.लातुर) या देवस्थान समितीच्या जमिनीवर अतिक्रमीत बांधकामे होत असल्याबाबत

**(२९) २१०३७ (१२-०८-२०१५). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरुडेश्वर देवस्थान समिती (ता.मुरुड जि.लातुर) या देवस्थान समितीच्या जमीनीतील जागेत बांधकामे न करण्याबाबत व जैसे थे परिस्थिती ठेवण्याबाबत मा.उच्च न्यायालयाचे निर्देश असतानाही सदर जमिनीवर अतिक्रमीत बांधकामे होत असल्याबाबत स्थानिक ग्रामस्थांनी माहे एप्रिल/मे २०१५ मध्ये वा त्या सुमारास तहसीलदार, लातूर यांचेकडे निवेदन करुन कारवाई करण्याबाबत मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व संबंधित दोषीवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे.

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०९-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे. अशा प्रकारचे निवेदन तहसिलदार, लातूर यांच्या कार्यालयात यापूर्वी प्राप्त झालेले आहे.

(२) सदर अतिक्रमण दूर करण्याबाबत तहसिलदार, लातूर यांनी संबंधित ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, मौ.मुरुड यांना कळविले आहे. तसेच उपविभागीय अधिकारी, लातूर यांनही गटविकास अधिकारी, पंचायत समिती, लातूर यांना सदर अतिक्रमणाबाबत कार्यवाही करण्यास

कळविले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर शहरात मागील तीन महिन्यांत सहा हजारांच्यावर वाहनधारकांनी वाहतुक सिग्नल तोडल्याचे निदर्शनास आल्याबाबत

**(३०) २२०७१ (०६-०८-२०१५). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शहरात मागील तीन महिन्यांत सहा हजारांच्यावर वाहनधारकांनी वाहतुक सिग्नल तोडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामध्ये रॅश ड्रायव्हिंग, सिग्नल तोडणे, ट्रीपल सीट, मोबाईलवर बोलणे, यासारख्या कारणामुळे सुध्दा वाहतुक सिग्नल तोडण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वाहनचालकांना वाहतुकीच्या नियमाचे पालन काटेकारपणे करण्यात सांगण्यात येते, तशी दंड व शिक्षेची तरतुद असुन सुध्दा सिग्नल तोडून पळून जाणा-या वाहनचालकांची संख्या सातत्याने वाढत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अशा ट्राफीक सिग्नल तोडणा-या वाहनचालकांवर कारवाई करण्याबाबत तसेच वाहतुक नियमांचे काटकोरपणे पालन करण्याकरीता शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-१०-२०१५) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.
(४) नागपूर शहरामध्ये वाहतूक नियमांचे उल्लंघन करणा-यांविरुध्द मोटार वाहन कायद्या अंतर्गत नियमितपणे कारवाई केली जाते. सन २०१५ मध्ये जुलै अखेर सिग्नल तोडणा-या १६,२८९, रॅश ड्रायव्हींग करणा-या २,५०३, ट्रिपल सीट जाणा-या ४,४४६, जणांवर, आणि वाहन चालविताना मोबईलवर बोलणा-या ६,९३५ जणांवर नागपूर वाहतूक विभागाकडून कारवाई करण्यात आली आहे. तसेच, वारंवार वाहतूक नियमांचे उल्लंघन करणा-या वाहनचालकांचे परवाने द्द करण्याकरीता प्रादेशिक परिवहन विभागाकडे प्रस्ताव पाठविण्यात येतात.

नागपूर शहरामधील शाळा/महाविद्यालयांमधील विद्यार्थी, तसेच सर्वसामान्य जनतेमध्ये वाहतूक नियमांचे पालन करण्याबाबत शिबिरे आयोजित करुन, द्दकश्राव्य माध्यमांद्वारे जनजागृती केल जात आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भालेसुर (जि.नागपूर) येथील देवराव अंनतरावर दोडके या शेतक-याने शेतात गळफास लावून आत्महत्या केल्याबाबत**

**(३१) २२१२३ (१०-०८-२०१५). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सततची नापिकी आणि अस्मानी संकटाला त्रासून नांद येथून ७ कि.मी. अंतरावरील भालेसुर (जि.नागपूर) येथील देवराव अंनतरावर दोडके या शेतक-याने दिनांक ८ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास शेतात गळफास लावून आत्महत्या केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेची माहिती नांद पोलीस ठाण्यास देण्यात आल्यानंतर पोलीसांनी घटनेचा पंचनामा केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी तपास करण्यात आली आहे काय, सदर तपासात काय आढळून आले आहे व त्यानुसार सदर शेतक-याला शासनातर्फे काही आर्थिक मदत करण्यात आली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०९-२०१५) :** (१) व (२) होय.

(३) दिनांक ०८ एप्रिल, २०१५ रोजी श्री.दोडके यांच्या भावांनी तक्रार दाखल केल्यावरुन पोलीस स्टेशन भिवापूर येथे अकस्मात मृत्यू क्र. १०/१५ सी.आर.पी.सी. कलम १७४ अन्वये प्रकरण नोंदविण्यात आले.

या प्रकरणी पोलीसांनी केला व तपासाअंती असे आढळून आले की, सदर इसमाला ६ महिन्यांपासून टाईफाईड झाला होता व तो लाडूकर हॉस्पीटल, ब्रम्हपूरी येथे उपचार घेता होता. या आजाराला कंटाळून त्याने जंगलात जाऊन नायलॉन दोरीने गळफास लावून आत्महत्या केल्याचे निदर्शनास आले आहे. त्याने कोणत्याही बँकेकडून / संस्थेकडून कर्ज घेतल्याचे आढळून आले नाही.

जिल्हाधिकारी, नागपूर यांच्याकडून त्यांना आर्थिक मदतीसाठी अपात्र ठरविण्यात आल्यामुळे त्यांना कोणतीही आर्थिक मदत करण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्ह्याच्या सिमावर्ती भागात झालेले अपघात**

**(३२) २२१७६ (१०-०८-२०१५). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्याच्या सीमावर्ती भागात माहे एप्रिल, २०१५ या एका महिन्यात वाहनांचे २० अपघात झाले असून यात तब्बल २१ जण ठार झाल्याचे माहे मे, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुषंगाने जिल्ह्याच्या सीमावर्ती भागात अपघात होण्याचे कारणे काय आहेत व त्यावर कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०९-२०१५) :** (१) हे खरे नाही.

एप्रिल, २०१५ मध्ये एकूण १९ अपघात झाले असून, या अपघातांपैकी शहर भागात ६, ग्रामीण भागात १० आणि सिमावर्ती भागात ३ अपघात झाले आहेत, या अपघातांमध्ये २१ जण मृत्युमूखी पडले आहेत.
(२) व (३) १९ प्राणंतिक अपघातामध्ये संबंधित पोलीस ठाण्यास गुन्हा नोंद करुन तपास करण्यात येत आहे.

सिमावर्ती भागात झालेल्या तीन अपघातांपैकी दोन अपघात हे वाहनचालकाने भरधाव वेगाने वाहन चालविल्यामुळे झाले आहेत. तर, वाहनचालकाने रस्त्याच्या कडेला निष्काळजीपणे वाहन उभे केल्यामुळे एक अपघात झाला आहे.

अशा प्रकारचे अपघात होऊ नये याकरीता ट्रान्सपोर्ट असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांना रस्त्यामध्ये निष्काळजीपणे वाहने उभी न करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. जिल्ह्यामधील महामार्ग व प्रमुख रस्त्यांवर पोलीसांकडून गस्त घातली जात. तसेच रस्ता सुरक्षा सप्ताहचे आयोजन करुन वाहनचालकांना मार्गदर्शन करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुण्यातल्या शुक्रवार पेठेतील नाईक बिल्डीग मध्ये खडकमाळ पोलीस स्टेशन हद्दीत जुगाराचा मॉल अनधिकृत पणे सुरु असल्याबाबत**

**(३३) २२२९३ (१०-०८-२०१५). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुण्यातल्या शुक्रवार पेठेतील नाईक बिल्डींग मध्ये खडकमाळ पोलीस स्टेशन हद्दीत अनधिकृत पणे जुगार सुरु असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याठिकाणी मटका, डोंट, चक्री, अंदर-बाहर असे जुगारचे कित्येक प्रकार या ठिकाणी उपलब्ध करुन जुगार खेळण्यासाठी शेकडो लोक जमा होतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनुसार कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-१०-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.

दिनांक २५ मे २०१५ रोजी शुक्रवार पेठ, मारोती मंदीराजवळ कोहीनूर आर्ट सेंटरच्या शेजारील बोळात ३ इसम स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी जुगार खेळत असल्याचे आढळून आले.

याबाबत खडक पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र.३०९७/२०१५ महाराष्ट्र जुगार अधिनियम कलम १२(अ) अन्वये गुन्हे दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्यात ३ आरोपींना अटक करण्यात आले असून रोख रक्कम रु.१२१०/- व जुगाराची साधने जप्त करण्यात आली आहेत.

(२) हे खरे आहे काय,

(३) जुगाराच्या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये सन २०१४ मध्ये ३१० गुन्हे व सन २०१५ मध्ये २०८ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील कारागृहांमध्ये डॉक्टरांची १७ पदे रिक्त असल्याबाबत

**(३४) २२५८० (१२-०८-२०१५). श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सातरस्ता येथील मध्यवर्ती कारागृहात (आर्थर रोड जेल) सध्या दोन हजार ५०० कैदी शिक्षा भोगत असतांना त्यांच्या आरोग्याची काळजी घेण्याकरीता अवघा एकच डॉक्टर असल्याचे माहे मे, २०१५ दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) तसेच, राज्यातील कारागृहामधील डॉक्टरांची १७ पदे रिक्त असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर डॉक्टरांची रिक्त पदे भरण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-१०-२०१५) :** (१) होय.

(२) कारागृह विभागाचे आस्थापनेवर वैद्यकीय अधिकारी यांची १२ पदे रिक्त आहेत.

(३) व (४) मे, २०१५ अखेर कारागृह विभागात वैद्यकीय अधिकारी यांची १६ पदे रिक्त होती. तद्‌नंतर आजअखेर मंजूर ४४ पदांपैकी ३२ पदे भरलेली असून १२ पदे रिक्त आहेत.

कारागृह विभागाचे आस्थापनेवरील सद्य:स्थितीत रिक्त असलेले वैद्यकीय अधिकारी यांची रिक्त पदे भरणेबाबत शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

---

**नांदेड जिल्हयातील सगरोळी ता.बिलोली येथील प्राचीन तलावाच्या सुशाभिकरणाच्या कामास पर्यटन स्थळाचा विकास कार्यक्रमांतर्गत विशेष बाब म्हणून निधी उपलब्ध करुन देणे.**

**(३५) २२६६१ (२४-०६-२०१५). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील सगरोळी ता.बिलोली येथील प्राचीन तलावाच्या सुशोभिकरणाच्या कामास पर्यटन स्थळाचा विकास कार्यक्रमांतर्गत विशेष बाब म्हणून निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी लोकप्रतिनिधीनी दिनांक २६ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने निधी उपलब्ध करुन देण्यसंदर्भात काय कार्यवाही केली आहे वा करणार आहे,

(३) नसल्यास, त्याची विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०९-२०१५) :** (१) होय.

(२) व (३) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या शासन निर्णय क्र. टीडीएस-२०१०/८/प्र.क्र.४६०/पर्यटन,दि४/११/२०१० अन्वये पर्यटनस्थळांच प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हयातील पर्यटन क्षमतेचे निकष ठरवून “क” वर्ग पर्यटन स्थळे निवड करुन जिल्हा नियोजन समितीतीस सादर करणे व त्यांच्या विकासासाठी जिल्हा नियोजन विकास निधीमधून निधी मंजूर करण्याची तरतूद आहे. त्यानुसार मा.स्थानिक लोकप्रतिनिधींच्या दि.२६/५/२०१५ च्या पत्रातील विनंतीबाबत आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी, नांदेड यांना देण्यात आल्या आहेत.

तसेच मा.लोकप्रतिनिधींच्या विनंतीच्या अनुषंगाने प्रादेशिक पर्यटन विकास योजनेतून कामे घ्यावयाची असल्यास उपरोक्त दि.४/११/२०१० चा शासन निर्णय व दि.२०/६/२०१४ च्या पत्रातील मार्गदर्शक सूचनांनुसार कामनिहाय प्रकरण तपासून मुद्देनिहाय अहवाल/प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभाग्राच्या सक्षम प्राधिका-यांच्या स्वाक्षरीची अंदाजपत्रके व नकाशा यासह शासनास सादर करण्याच्याही सूचना जिल्हाधिकारी, नांदेड यांना देण्यात आल्या आहेत.

---

**पारशिवनी (जि.नागपूर) पोलिसांनी जनावरांची अवैध वाहतूक करणारा मेटॅडोर पकडल्याबाबत**

**(३६) २२८१८ (१०-०८-२०१५). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पारशिवनी (जि.नागपूर) पोलिसांनी जनावरांची अवैध वाहतूक करणारा मेटॅडोर माहे मे, २०१५ मध्ये पकडला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-१०-२०१५) :** (१) होय.

तथापि, सदर घटना २७.२.२०१५ रोजी घडली आहे.

(२) या प्रकरणी जनावरांची अवैध वाहतूक करणा-या ३ जणांविरुध्द पो.स्टे. पारशिवनी येथे अप.क्र.३०१२/१५, प्राण्यांना निर्दयतेने वागणूक प्रतिबंधक कायदा कलम ३, ११ (ड) (ई) नुसार गुन्हा दाखल केला आहे. सध्या सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांगली जिल्ह्यातील मध्यवर्ती व शहरातील मुख्य असलेल्या बस स्थानकाच्या सुरक्षेबाबत**

**(३७) २३३८७ (१२-०८-२०१५). श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील मध्यवर्ती व शहरातील मुख्य बस स्थानक असलेल्या बसस्थानकामध्ये सुरक्षेसाठी फक्त १ सीसीटीव्ही कॅमेरा व तीन पोलीस बंदोबस्तासाठी असल्याचे माहे मे, २०१५ च्या पहिल्या आठवड्यामध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बसस्थानकाची सुरक्षा व्यवस्था वाढविणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-१०-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर ठिकाणी सुरक्षेसाठी सांगली शहर पोलीस ठाणे कडील बीट मार्शल, गुन्हे प्रकटीकरण शाखेकडील अधिकारी व कर्मचारी व बेकर मोबाईल हे देखील पेट्रोलिंग दरम्यान मध्यवर्ती बस स्थानकास भेट देऊन सुरक्षेचा आढावा घेतात.

राज्य परिवहन विभागाकडून सुरक्षीततेसाठी कंपाऊंड वॉल पुर्ण बांधण्यात आली आहे. सांगली आगारात ४ सुरक्षा रक्षक बसस्थानकाच्या सुरक्षेकरिता नेमण्यात आले असून प्रकाश व्यवस्था ठिक आहे. तसेच वाहतुक पर्यवेक्षक यांना ही सुरक्षिततेबाबत योग्य ती दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शिरपूर बांध, ता.देवरी, जिल्हा गोंदिया येथील या ठिकाणी मोठे धरण असून या ठिकाणी तिन्ही बाजू जंगलांनी आणि टेकडांनी सदर भाग व्यपला असून सदर ठिकाणी पर्यटनस्थळ होण्याबाबत.**

**(३८) २४०९७ (१०-०८-२०१५). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरपूर बांध, ता.देवरी, जिल्हा गोंदिया येथील या ठिकाणी मोठे धरण असून या ठिकाणी

तिन्ही बाजू जंगलांनी आणि टेकडांनी सदर भाग व्यापला असून सदर ठिकाणी पर्यटनस्थळ करण्याबाबत मागणी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) सदर ठिकाणी पर्यटनस्थळ झाल्यास नक्षलग्रस्त भागातील युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मागणीवर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,याबाबत कोणत्या उपाययोजना केल्या आहेत,
(४) सदर निर्णय घेतला असल्यास केव्हा पर्यंत काम सुरु होईल,
(५) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-१०-२०१५) :** (१) होय, दि.६/९/२०१२ रोजी झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या सभेत शिरपूर बांध/धरण “क” वर्ग पर्यटनस्थळ म्हणू मंजूर करण्यात आले आहे.
(२) पर्यटन व्यवसायाच्या विकासामुहे प्रत्येक्ष तसेच अप्रत्यक्षरित्या रोजगाराची निर्मिती होते.
(३), (४) व (५) पर्यतविकास कामाकरीता रु.२८७.१० लक्ष किमतीच्या कामांचा समावेश जिल्हा पर्यटन बृहद् आराखड्यामध्ये करण्यात आला आहे. तसेच “क” वर्ग पर्यटनस्थळासाठी जिल्हा वार्षिक योजनेतून विकास योजना राबविली जाते. पर्यटनस्थळाच्या विकासाच्याबाबतीत निधीच्या उपलब्धतेनुसार विकास कामे करण्यात येतात.

---

### जळगांव जिल्हा रुग्णालयात वॉडबॉयने बलात्कार करण्याचा प्रयत्न केल्याबाबत

**(३९) २४२७७ (१२-०८-२०१५). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव जिल्हा रुग्णालयातील वॉर्ड क्र.१२ मध्ये उपचार घेणा-या ३० वर्षीय तरुणीवर दिनांक १२ एप्रिल, २०१५ रोजी वॉडबॉयनेच बलात्कार करण्याचा प्रयत्न केल्याची घटना घडली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी पोलिस स्थानकांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-१०-२०१५) :** (१) होय.
(२) फिर्यादी तरुणीने दिलेलया फिर्यादीवरुन आरोपी वॉर्डबॉय याचे विरुध्द जिल्हापेठ पोलीस स्टेशन भाग-५ गु.र.नं.३८/२०१५ भादंवि कलम ३५४, ३५४ (अ) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(३) सदर गुह्यातील आरोपीस अटक करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समिती (जि.सातारा) केलेल्या करोडो रुपयांच्या आर्थिक घोटाळयाची सीआयडीकडून चौकशी करण्याबाबत**

**(४०) २४४०५ (१२-०८-२०१५). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समिती (जि.सातारा) ने केलेल्या करोडो रुपयांच्या आर्थिक घोटाळयाची सीआयडीकडून चौकशी करुन न्यासाची नोंदणी रद्द करणे, न्यासाचे सर्व विश्वस्तांवर फौजदारी गुन्हे दाखल करुन दंडात्मक कारवाई करण्यासंदर्भात मा.पर्यावरणमंत्री यांनी दिनांक १२ फेब्रुवारी, २०१५ रोजीच्या पत्रान्वये मा. मुख्यमंत्री याना विनंती केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात कोणता निर्णय घेण्यात आला वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०९-२०१५) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी निरिक्षक चौकशी क्र.१४७/१५ व १४८/१५ अन्वये चौकशी सुरु असून प्रकरण सहायक धर्मादाय आयुक्त यांचे समोर न्यायप्रविष्ठ आहे.

---

**सिंधुदुर्ग जिल्हयातील पर्यटन विकास आराखड्याबाबत**

**(४१) २४६५६ (१२-०८-२०१५). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्हयासाठी पर्यटन विकास आराखड्यासाठी १५०० कोटी रुपयांचा निधी शासनाने नुकताच मंजूर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हयातील किती व कोणत्या तालुक्यातील गावांचा समावेश करण्यात आला आहे,

(३) असल्यास, पर्यटन विकास आराखड्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०९-२०१५) :** (१) नाही. तथापि जिल्हाधिका-यांमार्फत सिंधुदुर्ग जिल्हयाचा पर्यटन विकासाचा बृहद् विकास आराखडा तयार केला आहे. या आराखड्याचे कआकारमान रु.१५४१.०० कोटी आहे.

(२) व (३) उपरोक्त आराखडा अद्याप अंतिम झालेला नसल्याने प्रश्न उद्भवत नाही.

---

**परळी उमरी (जि. बीड) येथील रहिवाशाच्या नातेवाईकांचे लग्न लावून जात असतांना भीषण अपघात झाल्याबाबत**

**(४२) २५१७४ (१०-०८-२०१५). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परळी उमरी (जि. बीड) येथील रहिवाशाच्या नातेवाईकांचे लग्न लावून गावाकडे परत असताना कानगावकर कुटूंबावर सुनेगाव तलावानजीक झालेल्या भीषण अपघातात चुलती-

पुतण्याचा जागीच मृत्यू झाला तर एकाच कुटुंबातील चालकासह चौघे गंभीर जखमी झाल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-९-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) दि. २४.५.२०१५ रोजी टिप्पर चालकाने हयगयीने व निष्काळजीप्रमाणे वाहन चालवून स्विफ्ट डिझायर गाडीला धडक दिल्याने अपघात घडल्याचे पोलीस तपासामध्ये निष्पन्न झाले आहे. टिप्पर चालकास दि. २६.५.२०१५ रोजी अटक केली असून न्यायालयाने दि. २७.५.२०१५ रोजी जामिन दिला आहे. घटनेचा अधिक तपास सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### श्रीसाई संस्थान शिर्डी (जि.अहमदनगर) येथील १५०० कामगारांना कायमस्वरुपी करणेबाबत

**(४३) २५६५५ (१२-०८-२०१५). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्रीसाई संस्थान शिर्डी (जि.अहमदनगर) येथील संस्थानमधील १५०० कामगारांना कायमस्वरुपी करणेबाबत मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, याबाबत होणा-या विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०९-२०१५) :** (१) होय.
(२) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथे कंत्राटदारामार्फत कार्यरत असलेल्या ९१६ कंत्राटी कर्मचा-याना संस्थानच्या सेवेत नियमित करण्याबाबतचा प्रस्ताव यापूर्वी शासनाने अमान्य केला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### तनपुरेवाडी (ता. आटपाडी जि.सांगली) येथील श्री.बबन पुंडलिक तनपुरे यांना ग्रामस्थांनी समाज व गावातून बहिष्कृत केल्याबाबत

**(४४) २५६८५ (१२-०८-२०१५). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तनपुरेवाडी (ता. आटपाडी, जि.सांगली) येथील श्री.बबन पुंडलिक तनपुरे यांना ग्रामस्थांनी लेखी आदेश काढून गेली तीन वर्षे समाज व गावातून बहिष्कृत केले असल्याचे माहे मे, २०१५

च्या तिस-या आठवड्यात वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) श्री.बबन पुंडलिक तनपुरे व त्यांच्या चुलतभावामध्ये घर जमीनीवरुन न्यायालयात प्रकरण सुरु आहे. त्यावरुन गावक-यांच्या मदतीने त्यांचे चुलत भाऊ त्रास देत असल्याबाबत तसेच त्यांना बहिष्कृत केल्याची त्यानी तक्रार केली होती. यासंबंधात तक्रार प्राप्त झाल्यावर पोलीस निरिक्षक, आटपाडी पोलीस ठाणे यांनी गावपातळीवर बैठक घेतली, सदर बैठकीमध्ये आपापसात समझोता होऊन कोणाविरुध्दही तक्रार नसल्याचा लेखी जबाब दिल्याने सदर प्रकरण निकाली काढण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उल्हासनगर येथील कॅम्प नं-३ परिसरात सायबर कॅफेमध्ये सेक्स रॅकेट सुरु असल्याबाबत**

**(४५) २५९१७ (१२-०८-२०१५). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उल्हासनगर येथील कॅम्प नं-३ परिसरात रेल्वे स्थानकाबाहेर चांदीबाई महाविद्यालयाच्या जवळच दोन सायबर कॅफेमध्ये मोठ्या प्रमाणात महाविद्यालयीन तरुण-तरूणीचे सेक्स रॅकेट सुरु असल्याचे माहे एप्रिल, २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-१०-२०१५) :** (१) उल्हासनगर मधील मध्यवर्ती पोलीस ठाणचे हद्दीत रामदेव अपार्टमेंट, शॉप नं.ए/१४ व शॉपनं. ३ एल,एमडी या सायबर सेंटरमध्ये अश्लिल चाळे चालू असल्याचे आढळून आले आहे.
(२) मध्यवर्ती पोलीस ठाण्यात गुन्हा रजि.नं.१७/१५ भा.दं.वि, कलम २९४, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्यात एकुण २४ आरोपींना अटक करण्यात आली व सदरचे दोन्ही सायबर कॅफे बंद करण्यात आली आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राजापूर (जि.रत्नागिरी) येथील कातळ शिल्पांची उचित दखल घेण्याबाबत

**(४६) २६३५६ (१२-०८-२०१५). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर (जि.रत्नागिरी) पासून १० कि.मी. अंतरावर कातळावर कोरण्यात आलेल्या ऐतिहासिक कातळ शिल्पांची महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने अद्यापपर्यंत दखल घेतलेली नाही, त्यामुळे ऐतिहासिक महत्वाच्या पर्यटन स्थळाला पर्यटकांना मुकावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कातळ शिल्पांची उचित दखल घेऊन त्यांची प्रसिध्दी करण्यासाठी पर्यटन महामंडळाने कोणती कार्यवाही केली आहे, वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०९-२०१५) :** (१) व (२) नाही. रत्नागिरी पर्यटन महोत्सवामध्ये जिल्ह्यातील काही पत्रकारांनी या कातळ शिल्पांविषयीची माहिती महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या रत्नागिरीच्या प्रादेशिक कार्यालयाच्या निदर्शनास आणून दिली आहे. त्या संदर्भात एक बैठक प्रादेशिक कार्यालय, रत्नागिरी यांचे स्तरावर घेण्यात आली त्यामध्ये सदरची शिल्पे खाजगी मालकीच्या जागी आहेत, असे निदर्शनास आले असल्याने सदर जागेबाबतची माहिती तहसील कार्यालयातून घेण्यात येत आहे. या कातळ शिल्पासंबंधी सविस्तर प्रस्ताव बनविण्याबाबतचे काम प्रादेशिक कार्यालय, रत्नागिरी यांचे स्तरवर सुरु आहे. सदर कातळ शिल्पे मोकळ्या जागत असल्याने पर्यटकांना ती पाहता येतात.

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळामार्फत प्रकाशित करण्यात येणा-या महाराष्ट्र अनिलिमिटेड या अंकात या कातळाबत प्रसिध्दी करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पुणे पोलिसांनी वेगवेगळ्या विद्यापीठांची बनावट शैक्षणिक प्रमाणपत्रे व गुणपत्रिकांची विक्री केल्याप्रकरणी एका व्यक्तीला अटक केल्याबाबत

**(४७) २६५८७ (१०-०८-२०१५). श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे पोलिसांनी वेगवेगळ्या विद्यापीठांची बनावट शैक्षणिक प्रमाणपत्रे व गुणपत्रिकांची विक्री केल्याप्रकरणी दिनांक १५ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास एका व्यक्तीला अटक केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-१०-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) दिनांक १४ जानेवारी, २०१५ रोजी पोलीसांना मिळालेल्या बातमीवरुन पोलिसांनी सिटी ॲकॅडमी ऑफ प्रोफेशनल स्टडीज यांच्या कार्यालयात छापा टाकला असता निरनिराळ्या विद्यापीठांची गुणपत्रके, मायग्रेशन सर्टिफिकेट्स प्रोव्हीजनल सर्टिफिकेट्स, डिग्री सर्टिफिकेट्स व पैसे भरल्याबाबतची पावती पुस्तके आढळून आली.

या कार्यालयास कायदेशीर मान्यता नसल्याचे आढळून आल्यामुळे कोंढवा पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र.१९/२०१५ भा.दं.वि. कलम ४६७, ४६८, ४७१, ४२०, ३४ नुसार दिनांक १४ जानेवारी, २०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी दोन आरोपी असल्याचे आढळून आले आहे. त्यामधील एका आरोपीस दिनांक १४ जानेवारी, २०१५ रोजी अटक करण्यात आली असून दुस-या आरोपीचा शोध चालू आहे. ज्या विद्यापीठांची कागदपत्रे आढळून आली आहेत त्या विद्यापीठांशी सत्यत्या पडताळण्यासाठी पत्रव्यवहार करण्यात आला आहे.

सदर गुन्हा पोलीस तपासावर प्रलंबित आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अकोला शहरात नेहरुपार्क चौकात वाहतुक नियंत्रण शाखेचे**
**टोईंग पथकाने अपघातग्रस्तास मदत न केल्याबाबत**

**(४८) २७१२६ (१२-०८-२०१५). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला शहरात नो एन्ट्री कालावधीत नेहरुपार्क चौकात रेती वाहतुक करणा-या एमटिव्ही २२५० क्रमांकाच्या ट्रकने दिनांक २५ मे, २०१५ रोजी एका दुचाकी स्वारास धडक दिल्याने जागीच ठार झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलीस वाहतुक नियंत्रण शाखेचे टोईंग पथकाने अपघातग्रस्त ठिकाणी अपघातग्रस्त व्यक्तीस आवश्यक सेवा देण्याऐवजी मदतीसाठी धावून गेलेल्या लोकांची वाहने उचलून ट्रक मध्ये टाकण्यास सुरुवात केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा बेजबाबदार अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०९-२०१५) :** (१) दि. २५.८.२०१५ रोजी नेहरू पार्क चौकाजवळील अकोला महानगरपालिकेच्या नाक्याजवळ अशोका वाटीका चौक ते नेहरु पार्क या मार्गावर शहरामध्ये प्रवेश न करता मुर्तिजापूरकडे जाणाऱ्या ट्रकने दुचाकी स्वारास धडक दिल्याने अपघात झाले आहे. दुचाकीस्वारास रुग्णालयामध्ये घेऊन गेले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषीत केले आहे.

(२) हे खरे नाही.

अपघात झाल्यानंतर अपघात पाहण्यासाठी घटनास्थळी मोठ्याप्रमाणात वाहनांची गर्दी झाली होती. त्यामुळे या ठिकाणी आणखी अपघात होऊ नये याकरिता प्रथम वाहन चालकांना त्यांची वाहने तेथून काढण्यास सांगितली. तद्नंतर आदेश न मानणाऱ्या वाहन चालकांवर वाहतूक पोलीसांनी आणखी अपघात होऊ नये या उद्देशाने मोटार वाहन कायद्याप्रमाणे कारवाई करण्यात आली.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चिखली (जि. बुलडाणा) येथे एम.आय.डी.सी व ग्रामीण भागासाठी स्वतंत्र पोलीस स्टेशनला मंजूरी मिळाण्याबाबत**

**(४९) २७३१५ (१२-०८-२०१५). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखली (जि. बुलडाणा) तालुक्याच्या ठिकाणी एकाच पोलीस स्टेशन अंतर्गत ३९ खेडे शहरासह एम.आय.डी.सी. चा समावेश असून वाढता व्याप लक्षात घेता पोलीस प्रशासनाने एम.आय.डी.सी व ग्रामीण भागासाठी स्वतंत्र पोलीस स्टेशनला मंजूरी मिळावी यासाठीचा प्रस्ताव शासनाकडे सादर केला असल्याचे माहे मे, २०१५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रस्तावाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०९-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवीमुंबई खांदेश्वर वसाहती मध्ये विद्यार्थीनीवर शिक्षकाने शारीरीक अत्याचार केल्याबाबत**

**(५०) २७७२१ (१२-०८-२०१५). ॲड.वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवीमुंबई खांदेश्वर वसाहती मधील सेक्टर १३ मधील दत्तकृपा शासकीय कर्मचारी सहकारी गृहनिर्माण सोसायटीतील वृदांवन खाजगी शिकवणी वर्गात येणाऱ्या न्यू होरायझन शाळेच्या दहावीच्या विद्यार्थीनीवर शिक्षक अक्षय पाटील याने माहे जून, २०१५ मध्ये वा त्या सुमारास शारिरीक अत्याचार केल्याची घटना घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बलात्कार प्रकरणाची दखल घेऊन संबधित पोलीस ठाण्यामार्फत आरोपीच्या विरोधात कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-१०-२०१५) :** (१) होय.

(२) आरोपी विरुध्द खांदेश्वर पोलीस ठाणे, नवी मुंबई येथे गुन्हा रजि.नं.८४/२०१५ भादवि कलम ३७६(२), सह लैंगीक अत्याचार बाल संरक्षण अधिनियम, २०१२ चे कलम ५/६ अन्वये दिनांक १७.६/२०१५ रोजी गुन्हा नोंद करण्यात अला आहे. आरोपीस अटक करण्यात आली असून आरोपी न्यायालयीन कोठडीत आहे. सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**

**मुंबई** **प्रधान सचिव**

**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.